प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना-कृषि यांत्रिकीकरण उप अभियान (अनुसूचित जमाती)- धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान केंद्र हिस्सा (६०%) व राज्य हिस्सा (४०%) साठी नविन लेखाशिर्षास मान्यता देणे बाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय, क्रमांक : कृवपदुम-१९०४५/११/२०२६-MAG-८A (१५८८३६६)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक- २२ जुलै, २०२६

संदर्भ:-संचालक, कृषि अभियांत्रिकी संचालनालय, कृषि आयुक्त कार्यालय, पुणे यांचे पत्र क्र.जा.क्र./कृषि यांत्रिकीकरण/गुनि-५/धरती आबा/१७९-र/२०२६ दि.०५.०३.२०२६

प्रस्तावना :-

केंद्र शासनाने धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान या योजनेला मान्यता दिली आहे. या योजनेचा उद्देश विविध शासकीय योजनांच्या एकत्रीकरणाद्वारे (convergence) आदिवासी क्षेत्रे आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी, विशेषत: कृषी क्षेत्रातील महत्त्वपूर्ण त्रुटी भरून काढत आदिवासी क्षेत्राचा समग्र, शाश्वत आणि समावेशक विकास साध्य करणे हा आहे. या योजनेअंतर्गत १७ मंत्रालये/विभागांमध्ये २५ घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यापैकी एक घटक “वनहक्क कायदा (Forest Rights Act - FRA) वनपट्टा धारकांच्या जमिनीत शाश्वत शेतीचा प्रसार करणे” हा आहे. धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत निधी वितरित करण्यासाठी सर्व राज्य शासनांना लेखाशिर्ष उघडण्याबाबत केंद्र शासनाकडून कळविण्यात आले आहे. त्यास अनुसरुन संदर्भाधिन पत्रान्वये संचालक, कृषि अभियांत्रिकी संचालनालय, कृषि आयुक्त कार्यालय, पुणे यांनी प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना-कृषि यांत्रिकीकरण उपअभियान अंतर्गत धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानासाठी नविन लेखाशिर्ष उघडण्याबाबत प्रस्ताव सादर केला आहे. यानुषंगाने प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना-कृषि यांत्रिकीकरण उप अभियान अंतर्गत (अनुसूचित जमाती)- धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान राबविण्यासाठी वेळोवेळी निधी वितरीत करण्याकरिता नविन लेखाशिर्षास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :

प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना-कृषि यांत्रिकीकरण उप अभियान (अनुसूचित जमाती)- धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान केंद्र हिस्सा (६०%) व राज्य हिस्सा (४०%) साठी खालील लेखाशिर्षास मान्यता देण्यात येत आहे.

मराठी		इंग्रजी	
(१) केंद्र हिस्सा (६०%)			
मागणी क्रमांक	टी-५	Demand No.	T-5
मुख्य लेखाशिर्ष	२४०१, पीक संवर्धन	Major Head	2401, Crop Husbandry
उप मुख्य लेखाशिर्ष	००	Sub Major Head	00
गौण शिर्ष	७९६, अनुसूचित जमातींसाठी विकास कृती योजना	Minor Head	796, Development Action plan for Scheduled Tribes
गट शिर्ष	(०१) जनजाति क्षेत्र उपयोजना	Group Head	(01) Tribal Area Sub Plan
उप गट शिर्ष	(०१) (५२) प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना- धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान (केंद्र हिस्सा ६० %) (कार्यक्रम) लेखाशीर्ष (२४०१B९३८)	Sub Group Head	(01) (52) PM-Rashtriya Krishi Vikas Yojana - Dharti Aaba Janjatiya Gram Utkarsh Abhiyan (Central Share 60%) (Scheme) CRC (2401B938)
(२) राज्य हिस्सा (४०%)			
मागणी क्रमांक	टी-५	Demand No.	T-5
मुख्य लेखाशिर्ष	२४०१- पीक संवर्धन	Major Head	2401, Crop Husbandry
उप मुख्य लेखाशिर्ष	००	Sub Major Head	00
गौण शिर्ष	७९६, अनुसूचित जमातींसाठी विकास कृती योजना	Minor Head	796, Development Action plan for Scheduled Tribes
गट शिर्ष	(०१) जनजाति क्षेत्र उपयोजना	Group Head	(01) Tribal Area Sub Plan
उप गट शिर्ष	(०१) (५३) प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना- धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान (राज्य हिस्सा ४० %) (कार्यक्रम) लेखाशीर्ष (२४०१B९४७)	Sub Group Head	(01) (53) PM-Rashtriya Krishi Vikas Yojana - Dharti Aaba Janjatiya Gram Utkarsh Abhiyan (State Share 40%) (Scheme) CRC (2401 B947)

२. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ६१२/२०२६/व्यय-१४ दि.३१.०३.२०२६ व नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २४६/२०२६, दि.२२.०६.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेने तसेच, मा.महालेखापाल कार्यालयाच्या जा.क्र.ख.वि./चा-५/कृषि व प.दु.म.विभाग/यु.ओ.आर-२२/२०२६-२७/२९५, दि.२६.०५.२०२६ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार, निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०७२२१६०१०६९६४६ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

BHUPESH ARUN KOLI

Digitally signed by BHUPESH ARUN KOLI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT,
2.5.4.20=c4831497ab54666fcf0fc384ac56a4a6e7eef3940ffe7ecbeff3b790dc48d7c0, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=44C8C2D62EADD87E9FFCCD81C023E722799B7A87A062FC30B0E6A3B49CBA4384, cn=BHUPESH ARUN KOLI
Date: 2026.07.22 16:02:07 +05'30'

(भुपेश अ.कोळी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
५. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प, मुंबई
७. संचालक (नियोजन व प्रक्रिया), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
८. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र१/२, मुंबई/नागपूर
९. महालेखापाल (लेखा व अ नुज्ञेयता), महाराष्ट्र१/२, मुंबई/नागपूर
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
१२. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई
१३. उप मुख्य लेखा परिक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई
१४. वित्त विभाग (कार्यासन व्यय -१, व्यय-१४/अर्थसंकल्प-३, अर्थसंकल्प-१९), मंत्रालय, मुंबई
१५. कक्ष अधिकारी, कार्यासन-६, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. कक्ष अधिकारी, (कार्यासन-१४११ व कार्यासन-१४३१), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१७. कक्ष अधिकारी, कार्यासन २-अे, कृषि व पदुम विभाग मंत्रालय, मुंबई
१८. मा.मंत्री (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१९. निवड नस्ती (का.८अे)